# पिंपरी चिंचवड  महानगरपालिका ,ड क्षेत्रीय कार्यालय,
## कार्यपत्रिका क्रमांक १
(सभापती निवडीची सभा)
## – सभावृत्तांत --

दिनांक : ०६/०२/२०१४ वेळ : दुपारी २.३० वा

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड प्रभाग समितीच्या सभापती निवडीची विशेष सभा गुरुवार दिनांक ०६/०२/२०१४ रोजी दुपारी २.३० वा. यशवंतराव चव्हाण सभागृह (मा.महापालिका सभागृह) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ येथे मा.श्री.गणेश पाटील, पीठासीन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.अनिता मच्छिंद्र तापकीर
२. मा.हिरानंद आसवानी
३. मा.प्रभाकर वाघेरे
४. मा.कैलासभाऊ थोपटे
५. मा.राजेंद्र जगताप
६. मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे
७. मा.सुनिता वाघेरे
८. मा.निता पाडाळे

याशिवाय मा. पी एच झुरे , क्षेत्रीय अधिकारी , हे सभेस उपस्थित होते.

प्रथम ड क्षेत्रीय अधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन दिनांक ५/०२/२०१४ रोजी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या एक सदस्यांचे नामनिर्देशन पत्र वाचून दाखविले व पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करुन पुढील कार्यवाही सुरु करणेबाबत विनंती केली. सदर एकच नामनिर्देशन पत्रामधील उमेदवारांचे सूचक व अनुमोदक खालीलप्रमाणे होते.

| नामनिर्देशन पत्र क्रमांक | उमेदवाराचे नांव | सूचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १ | मा.तापकीर अनिता मच्छिंद्र | मा.शकुंतला भाऊसाहेब धराडे | मा.वाघेरे सुनिता राजेश |

वरीलप्रमाणे ड प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या एकाच नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली. सदर एकच नामनिर्देशन पत्र छाननीत वैध ठरविण्यात आले. त्यामध्ये मा. ड प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा. तापकीर अनिता मच्छिंद्र या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी २.४० ते २.५५ असा १५ मिनीटांचा कालावधी देण्यात आला. सदर कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी माघारीचा अर्ज दिला नाही

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : ०६/०२/२०१४ | विभाग | : प्रशासन |

ड प्रभाग समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणा-या मा.तापकीर अनिता मच्छिंद्र या एकच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा.तापकीर अनिता मच्छिंद्र यांची ड प्रभाग समितीचे सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-

( गणेश पाटील )

पिठासीन अधिकारी
तथा
अप्पर जिल्हाधिकारी
पुणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी १७
क्र. डक्षेका १३/कावि/ ५३ /२०१४
दिनांक : ०६/०२/२०१४